**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४**

---

क्र.कोविमं/माध्य.गोप./ 4237
कोल्हापूर-४१६ ००४.
दिनांक :- १०.०८.२०२०

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालये,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६००४.

**विषय :- माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालयाचे प्रोफाईल भरणेबाबत.**
**संदर्भ :- क्र.रा.मं./परीक्षा-८/३४०४, पुणे, दिनांक ०५/०८/२०२० चे पत्र.**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालयांकडून वेळोवेळी अदययावत माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी प्रोफाईल भरण्याबाबत यापूर्वीच्या पत्रांव्दारे मुदतवाढ देण्यात आलेली होती, तथापि काही माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालयांची प्रोफाईल भरण्याबाबतची प्रक्रिया अदयापही अपूर्ण आहे. ज्या माध्यमिक शाळांनी/कनिष्ठ महाविदयालयांनी प्रोफाईल भरलेली नाही अशा शाळां/कनिष्ठ महाविदयालयांना माहिती भरण्याकरिता पुन:श्च मुदत देण्यात येत आहे.

शाळांनी **profile.mh-ssc.ac.in** व कनिष्ठ महाविदयालयांनी **profile.mh-hsc.ac.in** या वेबसाईटवर दिनांक १० ऑगष्ट ते १५ सप्टेंबर २०२० पर्यन्त माहिती भरावी.

फेब्रुवारी/मार्च २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी ) परीक्षेची आवेदनपत्रे भरुन घेण्याच्या कार्यवाहीपूर्वी प्रोफाईल भरावी. **प्रोफाईल भरुन घेतल्यानंतरच शाळांना व कनिष्ठ महाविदयालयांना एक युनिक नंबर देण्यात येणार आहे. सदर युनिक नंबरच्या आधारे परीक्षेची आवेदनपत्रे भरण्यासाठी लॉग-ईन करता येईल, अन्यथा आवेदनपत्रे भरता येणार नाही याची नोंद घ्यावी. अन्यथा याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील.**

भरलेली प्रोफाईल प्रत (Hard Copy) पोष्टाने अथवा हस्तपोच या कार्यालयास सादर करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव,:-
सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४